**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात सुरू असलेल्या जीएसटी बचत महोत्सवामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह असल्याचं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दूरस्थ पद्धतीनं आसियान शिखर परिषदेत सहभागी होणार

- सणासुदीच्या काळात दीड कोटी प्रवाशांनी घेतला विशेष रेल्वेगाड्यांचा लाभ

- कॅनडाकडून आयात होणाऱ्या मालावर अतिरिक्त १० टक्के कर लादायचा अमेरिकेचा निर्णय

**आणि**

- आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत आणि बांगलादेश आमनेसामने

**<><><><>**

देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी आज देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२७वा भाग होता. यंदाच्या सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी प्रचंड वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. कोणकोणती स्वदेशी उत्पादनं आपण खरेदी केली, याबद्दल नागरिकांनी संदेश पाठवून कळवल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

ऑपरेशन सिंदूरनं प्रत्येक भारतीयाला अभिमानानं भारून टाकलं आहे. कधीकाळी नक्षलवाद्यांच्या दहशतीखाली असलेल्या प्रदेशांमध्येही नक्षलवादाविरोधातल्या कारवाईमुळं यंदाच्या सणात आनंदाचे दीप प्रज्वलित झाले, असं सांगून, नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करायच्या ध्येयाचा पुनरुच्चार त्यांनी केला.

प्रधानमंत्र्यांनी देशवासीयांनी छठच्या शुभेच्छा दिल्या. संस्कृती, निसर्ग आणि समाजातल्या एकतेचं प्रतीक असलेल्या या सणाच्या निमित्ताने समाजातला प्रत्येक घटक एकत्र येतो, हे भारताच्या सामाजिक एकतेचं सर्वात सुंदर उदाहरण असल्याचं ते म्हणाले.

संस्कृत भाषेचं महत्व आणि तिच्या संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. या निमित्तानं त्यांनी यश साळंखे या महाराष्ट्रातील क्रिकेटटू आणि

कंटेट क्रिएटर करत असलेल्या प्रयत्नाचाही दाखला दिला. युवा वर्ग करत असलेल्या अशा प्रयत्नांमुळे आनंद वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

येत्या ३१ ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनाचं स्मरण करून, प्रधानमंत्र्यांनी पटेल यांच्या योगदानाला उजाळा दिला. यानिमित्त देशभरात आयोजित होणार असलेल्या ‘रन फॉर युनिटी’ मध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ७ नोव्हेंबर रोजी, वंदे मातरम्, या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाला प्रारंभ होणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि या गीताचं महत्त्व विषद केलं.

***होल्ड… MKB VANDE MATARAM***

यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि यासाठी नागरिकांनी आपल्याला सूचना पाठवाव्यात असं आवाहनही केलं.

निजामाच्या अन्यायाविरोधात लढा देणाऱ्या कोमरम भीम यांची २२ ऑक्टोबरला जयंती झाल्याच्या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या योगदानाला उजाळा दिला. तसंच १५ नोव्हेंबरच्या आदिवासी गौरव दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांनाही त्यांनी आदरांजली वाहिली.

स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाविषीच्या अभिनव उपक्रमांबद्दल प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. सागरी परिसंस्थेच्या जतन संवर्धनासाठी खारफुटीचं महत्व त्यांनी अधोरेखित केलं. आपणही जिथं राहतो तिथं झाडं लावावीत, एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी असं आवाहनही त्यांनी केलं.

भारतीय वंशाचे श्वान आजूबाजूच्या परिस्थितीशी सहजपणे जुळवून घेणारे असतात, त्यामुळे, यापूर्वी देशवासीयांना आणि सशस्त्र दलांना भारतीय जातीचे श्वान पाळायचं आवाहन केल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. त्याला प्रतिसाद देत सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं पथकांमध्ये भारतीय वंशाच्या श्वानांची संख्या वाढवल्याची माहिती त्यांनी दिली, तसंच सीमा सुरक्षा दलानं श्वानांना भारतीय नावं द्यायची परंपरा सुरू केल्याचंही त्यांनी सांगितलं. यादृष्टीनंच महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या मुधोळ हाउंड, आणि उत्तर प्रदेशातल्या रामपूर हाउंड या जातीच्या श्वानांना प्रशिक्षण देत असल्याची माहिती त्यांनी 'मन की बात'मधून दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दूरस्थ पद्धतीनं आग्नेय आशियातल्या देशांची संघटना असलेल्या आसियान शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत प्रधानमंत्री मोदी आणि आसियानच्या सदस्य देशांचे नेते आसियान आणि भारत यांच्यातल्या संबंधांच्या प्रगतीचा आढावा घेणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. यासोबतच सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट करण्यासंबंधीच्या उपक्रमांवरही चर्चा होणार असल्याची माहितीही निवेदनात दिली आहे. तसंच, उद्या क्वालालंपूर इथं होणाऱ्या विसाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिनिधित्व परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर करणार असून या परिषदेत भारत-प्रशांत क्षेत्रातलं स्थैर्य आणि समृद्धी, तसंच स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींशी संबंधित मुद्यांवर चर्चा केली जाणार आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह जागतिक नेते या परिषदेला उपस्थित आहेत.

**<><><>**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज दोन दिवसांच्या सेशेल्स दौऱ्यासाठी रवाना झाले. सेशेल्सचे नवनियुक्त राष्ट्राध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्या शपथविधी समारंभाला ते उपस्थित राहतील. सेशेल्स हा भारताच्या ‘व्हिजन महासागर’ या दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भागीदार असून, ही भेट सेशेल्सबरोबरची भागीदारी आणखी दृढ करण्याची भारताची वचनबद्धता अधोरेखित करत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><>**

सणासुदीच्या दिवसांमध्ये प्रवाशांच्या सोयीसाठी चालवण्यात आलेल्या विशेष रेल्वेगाड्यांचा लाभ आत्तापर्यंत दीड कोटीपेक्षा जास्त नागरिकांनी घेतला आहे. उत्सवांचा हा काळ संपेपर्यंत हा आकडा अडीच कोटीपेक्षा वर जाईल, अशी अपेक्षा असल्याचं रेल्वे मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दोन्ही टप्प्यांच्या प्रचाराला वेग आला आहे. एनडीए आणि महाआघाडीचे ज्येष्ठ नेते आणि स्टार प्रचारक आज विविध ठिकाणी सभांना संबोधित करणार आहेत. प्रचारादरम्यान, कायदा आणि सुव्यवस्था, बेरोजगारी, स्थलांतर,

बिहारचा विकास आणि इतर प्रमुख मुद्द्यांवर दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. जदयूचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काल एनडीएच्या उमेदवारांसाठी अनेक ठिकाणी सभा घेतल्या, तर महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी प्रसाद यादव हे देखील अनेक मतदारसंघांमध्ये प्रचार सभा घेत आहेत.

**<><><><>**

लॉरेन्स बिश्नोई टोळीचा प्रमुख सदस्य लखविंदर कुमार याला सीबीआयनं परराष्ट्र मंत्रालय आणि गृह मंत्रालयाच्या समन्वयाने, अमेरिकेतून भारतात परत आणलं आहे. हरियाणा पोलिसांच्या पथकानं काल त्याला नवी दिल्ली इथं अटक केली. हरियाणामध्ये त्याच्यावर खंडणी, धमकी देणं, बेकायदेशीर मालमत्ता गोळा करणं, असे अनेक खटले दाखल करण्यात आले आहेत.

**<><><><>**

अमेरिका आणि कॅनडा यांच्यातल्या वाढत्या तणवाच्या पार्श्वभूमीवर कॅनडाकडून आयात होणाऱ्या मालावर १० टक्के अतिरिक्त कर लादायचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल घेतला. या मालावर आधीपासून लागू असलेल्या करा व्यतिरिक्त हा कर वसूल केला जाईल, असंही ट्रम्प यांनी स्पष्ट केलं. अमेरिका लादत असलेल्या कराला विरोध करण्यासाठी कॅनडानं चालवलेल्या मोहिमेदरम्यान अमेरिकेचे माजी अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचं वक्तव्य चुकीच्या पद्धतीनं वापरल्याचा आरोप करून ट्रम्प यांनी नुकताच कॅनडाबरोबरच्या सर्व व्यापारी चर्चा थांबवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ही चर्चा पुन्हा सुरू करायची कॅनडाची तयारी असल्याची भूमिका कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी मांडली आहे.

**<><><><>**

राजधानी दिल्लीत हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, आज सकाळी एक्यूआय, म्हणजेच हवेचा गुणवत्ता निर्देशांक ३२२ इतका नोंदवला गेला. शहराच्या अनेक भागांमध्ये तो ३५०च्या पुढे गेल्याचं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं म्हटलं आहे. वातावरणात धुरकं भरल्यामुळे आज सकाळी राजधानीमध्ये स्प्रिंकलरमधून पाण्याची फवारणी करण्यात आली.

**<><><><>**

बंगालच्या उपसागरात आग्नेयेकडे निर्माण झालेल्या ‘मोंथा’ चक्रीवादळाचा जोर वाढत असून, ते आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीकडे सरकत आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनानं मदत कार्याची तयारी सुरु केली आहे. मच्छिमारांनी खोल समुद्रात जाऊ नये असा इशाराही देण्यात आला असून, येत्या बुधवारपर्यंत मासेमारी, नौकाविहार आणि किनारपट्टी भागातले सर्व प्रकारचे उपक्रम स्थगित करण्यात आले आहेत.

चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर पुडुचेरीमध्येही यानम इथल्या प्रशासनानंही खबरदारीच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत. हे चक्रीवादळ २८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी किंवा रात्रीपर्यंत काकीनाडाजवळ धडकण्याची शक्यता आहे. येत्या २९ तारखेपर्यंत या भागात ताशी ९० ते १०० किलोमीटर वेगाने वारे वाहतील, तसंच अतिमुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**<><><><>**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा सामना आज बांगलादेशविरुद्ध होणार आहे. नवी मुंबईत दुपारी तीन वाजल्यापासून हा सामना सुरू होईल. या स्पर्धेत आत्तापर्यंत भारतानं एकंदर सहा सामन्यांपैकी तीन सामने जिंकले आहेत, तर तीन सामन्यांमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला. भारत ६ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर आहे. तर बांगलादेशनं ६ सामन्यांपैकी फक्त एक सामना जिंकला असून त्यांचा संघ गुणतालिकेत शेवटच्या स्थानावर आहे.

**//<><><><>//**